## माणसं जाणून घेण्याचा माझा प्रयत्न

(आकाशवाणीवरून प्रसारित झालेल्या मुलाखतीचा संपादित भाग)

**प्रश्न :** साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आपल्या मनात उमटलेली भावना काय होती?

**उत्तर :** असं आहे की, साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद हा एक मोठ्या सन्मानाचा भाग आहे. पण नुसत्या अशा पदांनी माणूस मोठा होतो यावर काही माझा विवास नाही. या पदावर किती मोठंमोठी माणसं होती, त्याचं स्मरण केलं की, त्यांच्या मानाने आपण कुणीच नाही हे लक्षात येतं. किती मोठ्या माणसांना हे पद मिळू शकलं नाही हेही कळतं. विवनाथ काशीनाथ राजवाडे यांच्यासारखा इतिहासाचार्य, मेघयाम पुंडलिक रेगे किंवा नानासाहेब गोरे हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊ शकले नाहीत. पण त्यामुळं ते लहान राहिलेले नाहीत. एक आहे की, माझे विचार काय आहेत, हे सांगण्याची संधी या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदामुळं मला मिळणार आहे.

**प्रश्न :** आता तुमच्या लिखाणाबद्दल मला विचारयचं आहे. तुमच्या पुस्तकांवर नजर टाकली तर असं लक्षात येतं की, तुम्ही पहिलं पुस्तक लिहिलं त्याला आता पन्नास वर्षे होऊन गेली. परवा तुमचं 'पंतप्रधान नेहरू' असं पुस्तक आलं आहे. साधारण तीस पुस्तकं या कालावधीत तुम्ही लिहिली. आज सुरुवातीलाच मला स्वामीजींच्या चरित्राचा उल्लेख करायचा आहे. हे पुस्तक तुम्हाला का लिहावसं वाटलं?

**उत्तर :** मला प्रेरणा मिळाली ती पचिम महाराष्ट्रात आपल्या स्वातंत्र्यलढ्याबद्दलच काय पण त्यावेळच्या हैदराबादमधील जीवनाबद्दल जे अज्ञान होतं, त्यातून. तिकडं काहीच माहीत नव्हतं. स्वामीजी आणि त्यांचे सहकारी हे जरा संकोची, भिडस्त स्वभावाचे होते. आपलं जुनं तत्त्वज्ञान त्यांना माहिती होतं. माणूस किंवा व्यक्ती गौण आहे, तो नवर आहे, महत्त्व आहे ते एकूण समाजाला. पण खरं म्हणजे असं नसतं. तुम्हाला तुमची चळवळ का झाली, हे सांगायला पाहिजे. कारण हा इतिहासाचा भाग आहे. तुम्ही गेलात की तुमच्यापुरता हा इतिहास बुडून जातो. म्हणून मला वाटलं की, आपण हे चळवळीबद्दल लिहावं. यात जे लिखाण झालं त्यात सर्वांत महत्त्वाचं म्हणजे स्वामीजींचं चरित्र. सरोजिनी वैद्य राज्य मराठी विकास परिषदेच्या अध्यक्ष होत्या. त्यांनी मला विचारलं की, तुम्ही स्वामीजींचं चरित्र लिहाल का? त्यांना ते दीडएकशे पानांत हवं होतं. प्रा.रा.रं बोराडे यांनीही ते साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष असताना मला स्वामीजींचं चरित्र लिहिण्याबद्दल विचारलं होतं. पण स्वाभाविकच पानांची मर्यादा होती. माझ्या लक्षात आलं की, स्वामीजींचं चरित्र लिहायचं असेल तर ते विस्तृत लिहायला हवं. शंभरसव्वाशे पानांत ते आटोपणारं नाही. तेव्हा मी उच्च न्यायालयात न्यायाधीश होतो. मला जी सुटी मिळत होती तिचा आपण उपयोग करू, असं मी ठरवलं. पुराभिलेखात असलेली कागदपत्रं, सरकारी अहवाल पाहण्यासाठी मी दिल्लीला जाण्याचं ठरवलं. हिवाळ्याचे दिवस होते. मी थोडा कुडकुडत पुराभिलेख कार्यालयात बसलो. तेथे सरकार आडनावाचे गृहस्थ अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्यांना माझी अडचण लक्षात आली. त्यांनी माझ्या पायापाशी दोन हिटर्स आणून लावले आणि मला शक्य त्या सवलती दिल्या. मी हैदराबादला पुराभिलेखात गेलो. तेथील लोकांनी मला विचारलं, तुम्हाला कोणत्या नंबरची फाईल हवी? मला नंबर माहिती नव्हते आणि तेथे कॅटलॉगही तयार झाले नव्हते. मग नंबर कसा सांगणार? तेथे त्यावेळी कृष्णकांत राज्यपाल होते. पुढे ते आपले उपराष्ट्रपतीही झाले. मी त्यांना भेटायला गेलो. न्यायाधीश असल्यामुळं थोड्या धिटाईने हे सगळं करणं शक्य होतं. त्यांच्याशी बोलताना स्वामीजींच्या चरित्राचा उल्लेख निघाला. मी माझी अडचण सांगितली. ते लगेच काही बोलले नाहीत. पण दुसऱ्या दिवशी मला तेव्हाच्या मुख्य सचिवांचं पत्र मिळालं. त्यांनी ते तेथील पुराभिलेख कार्यालयाला पाठवलं होतं. त्यात मुख्य सचिवांनी

पुराभिलेखाला कळवलं होतं की, मला वर्षभरासाठी कोणत्याही प्रवेशपत्राशिवाय प्रवेश दिला जावा आणि दोन संशोधन सहायक उपलब्ध करून द्यावेत. माझ्यादृष्टीने ही मोठीच मदत होती. कृष्णकांतांच्या चांगुलपणामुळं हे शक्य झालं. दुसरं म्हणजे मी हे चरित्र लिहिण्याची पूर्वतयारी करत होतो, तेव्हा स्वामीजींचे बरेच सहकारी हयात होते. शक्यतेवढ्यांच्या मी मुलाखती घेतल्या. माझ्या असं लक्षात आलं की, स्वामीजींच्या जीवनाबद्दल सलगपणे कुणाला फारशी माहिती नाही. लढ्याविषयी तर पुष्कळच समज-गैरसमज होते. ते पुस्तक लिहिल्यावर मला तो काळ जगता आला. त्यात एक आनंद होता आणि आपण एक आपलं कर्तव्य पूर्ण केलं असाही त्यात भाग होता. माझ्यादृष्टीनं हा दुहेरी आनंद होता. इतिहास जगण्याचा आणि थोडेफार कर्तव्य पूर्ण केल्याचा.

**प्रश्न :** प्रख्यात इतिहाससंशोधक डॉ. य.दि. फडके यांचा अभिप्राय मला आठवतो. ते म्हणाले होते की, हे स्वामीजींचं चरित्र तर आहेच; पण हा चळवळीचाही इतिहास आहे. तर मला आता सांगा की, हैदराबादच्या चळवळीचं मोठं वैशिष्ट्ये काय?

**उत्तर :** मुख्य आणि आज मुद्दाम लक्षात घ्यावं असं वैशिष्ट्य म्हणजे ही चळवळ धर्मनिरपेक्ष होती. राजा मुसलमान आणि बहुसंख्य प्रजा हिंदू, असं चित्रं असताना, ही चळवळ धर्मनिरपेक्ष राहिली याचं एक कारण गांधीजी या चळवळीचे मार्गदर्शक होते हे आहे. दुसरं म्हणजे सर्वसाधारणपणे आपण 1938 ते 1948 हा या चळवळीचा कालखंड मानला तर सुरुवातीला या चळवळीत कनिष्ठ मध्यमवर्गातील लोकं होते. त्यातील काही त्यावेळच्या शहरात राहणारे होते. फारशी चांगली सांपत्तिक स्थिती नसलेले हे लोक माझ्या पिढीला पितृस्थानी होते. पुढे निजामाने अन्नधान्याच्या टंचाईवर उपाय म्हणून लेव्हीची सक्ती केली. जोडीला नावापुरती खूशखरेदी लादली. म्हणजे नाव फक्त खूशखरेदी होतं आणि शेतकऱ्यांचे अंगठे उमटवून घेत सक्तीनेच खरेदी केली जात होती. त्यातून शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला. या अन्यायाविरुद्ध बहुजन समाजाने आवाज उठवला तो चळवळीत मोठ्या प्रमाणात आला. बहुजन समाजाच्या पाठिंब्याने झालेली ही चळवळ आहे. आणखी एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे की, चळवळीतील नेते निरपेक्ष भावनेनं काम करीत होते आणि त्यांच्या दृष्टीनं स्वातंत्र्याचा अर्थ केवळ निजामाची सत्ता जाणं हा नव्हता तर संस्थानाबाहेरच्या मराठी भागाशी संस्थानातला मराठी भाग जोडला जाणं हाही होता. सत्तेचा दुरूनसुद्धा लोभ किंवा मोह या मंडळींना नव्हता, हे फार महत्त्वाचं आहे.

**प्रश्न :** तुमच्या एकूण साहित्यावर नजर टाकली तर असं दिसतं की तुम्ही व्यक्तिचित्रं हा प्रकार फार समर्थपणे हातळला आहे. मला सांगा की, व्यक्तिचित्र रेखाटताना जी मनोभूमिका लागते ती कशी हवी? आणि एक समर्थ साहित्य प्रकार म्हणून व्यक्तिचित्रणांकडे आपण पाहता का?

**उत्तर :** पुष्कळदा आपण व्यक्तिपरिचय लिहितो. मला वाटतं की तो त्याचा परिचयच असतो. माणूस कधी जन्माला, त्याने शिक्षण कुठे घेतले, कोणता व्यवसाय केला, पुस्तकं किती लिहिली वगैरे तपशील त्यात असतो. पण हा शेवटी परिचयच असतो. मला वाटतं की माणूस कसा आहे, याचं मला कुतुहल होतं. हा माणूस या प्रसंगी किंवा अन्य कोणत्या प्रसंगी कसा वागला आणि का वागला हे समजावून घेतलं म्हणजे व्यक्तिचित्र लिहायला मदत होते. माणसाला जाणून घेण्याचा प्रयत्न म्हणून मी व्यक्तिचित्र लिहिली आणि त्यामुळचं हा साहित्य प्रकारही मला आवडला. व्यक्तिचित्र लिहिण्यासाठी मी माहिती तपासून घेत होतो तेव्हा मला आणखी नवी माहिती मिळत होती आणि त्यात एक आनंद मिळत होता. केवढी मोठी माणसं आपल्याकडे होऊन गेली! आपल्याला सरदार पटेलांसारखा माणूस दिसतो. मला एसेम, अनंतराव भालेराव अशी माणसं पहायला मिळाली. त्यांच्याबद्दल मी लिहिलं.

**प्रश्न :** हो.... पण असं दिसतं की तेव्हा चळवळीत असलेल्या माणसांबद्दल आपण जसं लिहिलं तसं त्यावेळी दुसऱ्या बाजूनं जे होते त्यांच्याबद्दलही आपण लिहिलं. नावचं घ्यायच तर महाराजा किशनप्रसाद, अलीयावर जंग यांचा उल्लेख करता येईल. त्यांच्यावर लिहावं असं तुम्हाला का वाटलं?

**उत्तर :** काही प्रसंग कारणीभूत ठरतात. मी विद्यापीठ कार्यकारिणीत असताना गोविंदभाई श्रॉफ यांना सन्माननीय पदवी द्यावी, असा ठराव मांडला आणि तो मंजूर झाला. त्यानंतर मी तेव्हा आपले राज्यपाल असणारे अलीयावर जंग यांना भेटायला गेलो. त्यांनी माझं ऐकून घेतलं आणि ते मला म्हणाले, तू मला पापक्षालनाची संधी देत आहेस. मला आचर्य वाटलं. मी त्यांना विचारलं, "नवाब साहेब, आपण म्हणता त्याचा अर्थ काय?" त्यावर ते म्हणाले, अरे हैदराबाद राज्याला असणारा सर्वांत मोठा धोका म्हणजे गोविंदभाई, असा रिपोर्ट मीच संस्थानात असताना लिहिला होता. आता ही सन्माननीय पदवी देताना मला तू पापक्षालनाची संधी देत आहेस.

मला वाटतं अशा अनेक गोष्टी सांगता येतील. सगळी माणसं काही वाईट नसतात. माणसांमध्ये काही चांगले गुणही असतात. कोणताही माणूस गुणदोषांनी युक्त असतो. त्याच्या गुणदोषासहित आपण त्याला जाणून घेतलं पाहिजे.

**प्रश्न :** व्यक्तिचित्रणाबद्दल तुम्ही तुमची भूमिका सांगितली. मनातली माणसं, संस्थानी माणसं, हरवलेले स्नेहबंध अशी तुमची व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकं आहेत. तुम्ही न्या. रानडे, न्या. तेलंग, न्या. चंदावरकर यांच्याबद्दल एक पुस्तक लिहिलं आहे. याला जोडूनच मला वाटतं गोपाळ कृष्ण गोखले आणि त्यांचा भारत सेवक समाज या पुस्तकाचा कदाचित एकत्र विचार करता येईल. मला वाटतं यात कुठे तरी उदारमतवादाचा धागा आहे. तुम्हाला हे का लिहावयं वाटलं आणि आज या उदारमतवादाचं काय महत्त्व आहे ?

**उत्तर :** असं आहे की, आपल्याकडे राजकीय इतिहास असो की सामाजिक, त्यातील काही तरी निवडक, सोयीचं, आपल्याला जे पाहिजे तेवढं लोकांना सांगितलं जातं. जसं हैदराबादचा इतिहास बाहेर माहीत नव्हता आणि तो सांगावा असं मला वाटलं. तसचं न्या. रानडे असतील किंवा लोकहितवादी असतील किंवा विठ्ठल रामजी शिंदे असतील त्यांच्याबद्दल लिहावं असं मला वाटलं. कारण त्यामुळं महाराष्ट्रामध्ये उदारमतवाद रुजवण्याचा कसा प्रयत्न झाला, राजकीय किंवा सामाजिक बाबतीत मतभेद असूनही हे लोकं एकमेकांवर कसे प्रेम करत होते हे आज कळायलं हवं. लोकहितवादींना धमक्या येऊ लागल्या तेव्हा म. फुले यांनी त्यांच्या रक्षणासाठी दोन पैलवान पाठवले होते. सत्यशोधक समाजाच्या एका मिरवणुकीत न्या. रानडे सहभागी झाले होते. हे सामंजस्य होतं. गोपाळ कृष्ण गोखले यांनी तर त्यांच्या उदारमतवादापायी सामान्य माणसाचा रोष ओढावून घेतला होता. पण गोखल्यांची बुद्धिमत्ता, देशभक्ती निरपवाद होती. त्यांच्याबद्दल सामान्य मराठी माणसापासून ते तेव्हाच्या ब्रिटिश अधिकाऱ्यापर्यंत अनेकांनी गौरवोद्गार काढलेले आहेत. गोखल्याचं फाटकांनी लिहिलेलं चांगलं चरित्र उपलब्ध आहे. त्यामुळं मला वाटलं की, आपण भारत सेवक समाजाबद्दल लिहू. मी ते लिहून काढलं.

**प्रश्न :** आपल्याला आणखी दोन पुस्तकांचा एकत्र विचार करता येईल. राज्यघटनेचे अर्धशतक हे एक आणि विधिमंडळ आणि न्यायसंस्था : संघर्षमय सहजीवन ही पुस्तकं मला फार महत्त्वाची वाटतात. तुलनेने छोटी आहेत ती. पण आपल्या राज्यघटनेचं आणि एकूणच व्यवस्थेचं सामर्थ्य सांगणारी आहेत. काय सांगाल आपण या दोन पुस्तकांबद्दल?

**उत्तर :** काँग्रेसने 1930 साली नागरिकांचे जे मूलभूत अधिकार मान्य केले होते ते राज्यघटनेने मान्य केले. एक प्रकारे शिक्कामोर्तब केले. दुसरं म्हणजे राज्यघटनेत एक लवचिकता आहे, पण त्याचबरोबर राज्यघटनेचं मूलभूत स्वरूप बदलता येणार नाही, अशी अंतर्गत रचना आहे. आपल्याकडील संस्थांनी एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करायचा नाही, अशी घटनेची मूळ कल्पना आहे.

**प्रश्न :** तुम्ही राज्यघटनेच्या निमित्तानं डॉ. आंबेडकर आणि म. गांधी यांच्याबद्दल लिहिलं आहे...

**उत्तर :** आपल्या घटनेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं फार मोठं योगदान आहे. फार परिश्रमपूर्वक त्यांनी मसुदा समितीतं काम केलं. आपल्याला माहिती आहे की, या समितीच्या बैठकीला कधी ते एकटेच हजर असत. आपल्याकडे लोकशाही पाहिजे, धर्मनिरपेक्षता पाहिजे, याबद्दल तसं एकमत होतं. डॉक्टरांनी घटनेतील तरतुदींचा काय अर्थ निघेल याचा बारकाईनं विचार केला. त्यामुळं हे लोकांसमोर मांडण्यासाठी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारताचे संविधान असं पुस्तक लिहिलं. पुढे आपल्या राज्यघटनेला पन्नास वर्षे झाली तेव्हा या घटनेची अंमलबजावणी कशी झाली, ज्याला आपण लोकशाही, धर्मनिरपेक्षता म्हणतो त्या संदर्भातील चित्र काय आहे, याची आपण काही तपासणी करावी म्हणून मी राज्यघटनेचं अर्धशतक हे पुस्तक लिहिलं. आपल्याकडं असं एक समज आहे की, म. गांधी आणि राज्यघटना यांचा काही संबंध नाही. वास्तविक आपली राज्यघटना कशी असावी, याबद्दल गांधीजींची स्वतःची मतं होती आणि ती त्यांनी त्यांच्या पद्धतीने मांडली आहेत. लोकशाही आणि व्यक्तीस्वातंत्र्य या बाबी आपण स्वीकारल्या आहेत, पण खेडं हा घटक असावा, स्वयंपूर्ण घटक असावा, हा गांधीजींचा आग्रह होता. तो घटनासमितीने स्वीकारलेला नाही. हा भाग सांगायला हवा म्हणून मी ते पुस्तक लिहिलं.

**प्रश्न :** आपल्या स्वातंत्र्यलढ्यातील नेते म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल ते लोकमान्य टिळक, म. गांधी, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस, सरदार पटेल, राजाजी यांच्यावरचं तुमचं एक पुस्तक आहे. फार छान शीर्षक आहे त्या पुस्तकाचं. त्यांना समजून घेताना.... या पुस्तकाला वाचकांचा मोठा प्रतिसादही आहे. काय सांगाल या पुस्तकाबद्दल?

**उत्तर :** तुम्ही म्हणता तसा या पुस्तकाला वाचकांचा मोठा प्रतिसाद आहे. आता हे पुस्तक लिहिताना माझ्यासमोर फारसं खोलात न जाता मोठ्या माणसांविषयी गैरसमज करून घेण्याची वृत्ती होती. नेहरू आणि वल्लभभाई यांच्यात मतभेद होते का? तर होतेच. पण ते काही परस्परांचे शत्रू नव्हते. काही जण असं सांगतात की, आपल्याला प्रतिस्पर्धी नको, म्हणून नेहरूंनी सुभाषबाबूंना भारतात येऊ दिलं नाही. पण हे खरं नाही. महात्माजींनी सुभाषचंद्र बोसांना स्पष्टपणे सांगितलं होतं की, ब्रिटिशांच्या जागी जपानी लोक आले तर काही आपलं कल्याण होणार नाही. तू असं करू नकोस. ब्रिटिशांना आपल्याला स्वातंत्र्य द्यावेच लागणार आहे. गांधीजींना नेताजी पुत्रवत होते आणि सगळे मतभेद असूनही सुभाषबाबूंनी गांधीजींना राष्ट्रपिता म्हटलं आहे, हे लक्षात घ्यावं लागतं. लोकांनी हे समजून घ्यावं म्हणून मी हे पुस्तक लिहिलं.

**प्रश्न :** आपण आतापर्यंत ज्या पुस्तकावर बोललो, ती पुस्तकं एक प्रकारे राजकीय आहेत असं म्हणता येईल, पण तुमचं एक पुस्तक वेगळं आहे. सावलीचा शोध. ज्याला सामाजिक इतिहास म्हणतात, तसं हे पुस्तक आहे. ते पुस्तक लिहिण्यामागे तुमची जिज्ञासा आहे. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी एका वेगळ्या पुस्तकात उल्लेख केला आहे की, जिज्ञासा हा तुमच्या लिखाणाचा एक मोठा पाया आहे. तर या पुस्तकाच्या लिखाणामागची प्रेरणा कोणती?

**उत्तर :** मी एक दिवस गॅझेटियर चाळत होतो. त्यात बेथलेम हा उल्लेख आढळला. जालना जिल्ह्यातील एका खेड्याचं हे नाव. मला प्रश्न पडला हे इकडं कुठं आलं. कारण हा उल्लेख तर बायबलमधला आहे. मग मी जालन्यातील एक मित्र डॉ. मोजेस यांना बोललो. तर ते म्हणाले जालन्यापासून सहा मैलावर हे गाव आहे. तुम्हाला पाहयचे असेल तर या आपण जाऊ. मी तिथं गेलो तिथे एक चर्च होता आणि समाधीसुद्धा. मग मी माहिती घेतली. परळीचा एक ब्राह्मण शेषाद्रि आणि त्याच्या मुलाचं विल्सनने धर्मांतर केलं. त्याबद्दल तेव्हा वादळ ही उठलं. ही माहिती आजच्या पिढीला असण्याची शक्यता नव्हती. मी ती व्हायला हवी म्हणून लिहिलं.

**प्रश्न :** आपलं जे एकूण लिखाण आहे त्याचं वर्णन वैचारिक साहित्य असं करता येईल. आज अशा प्रकारचं लिखाण कुणी करू इच्छित असेल तर त्याला काय सांगाल?

**उत्तर :** एक तर विनोबांनी दिलेला सल्ला त्यांनी लक्षात घ्यायला हवा. त्यांनी सांगितलेलं आहे की, समाजाला समग्र पहा. दुसरं म्हणजे वैचारिक साहित्य लिहिणाऱ्याला समाजाविषयी कळकळ असावी लागते. त्यात स्वार्थ नसला पाहिजे. अमूक एक गोष्ट मी अमूक एक प्रकारे लिहिली म्हणजे मी लोकप्रिय होईल, अशी ज्याची भूमिका असेल तो वैचारिक साहित्य लिहू शकत नाही.

**प्रश्न :** आपण एक वक्ते म्हणून महाराष्ट्राला परिचित आहात. व्यासपीठावर गेल्यावर माणसाला पुष्कळदा टाळ्यांचा मोह होतो. लोकप्रियतेचा मोह होतो, मग माणूस त्यापायी बौद्धिक शिस्त सोडून देतो असं काही वेळा होतं. आपल्या बाबतीत असं काही घडलं असं मी ऐकलं नाही. लिखाणातही तसं झालेलं दिसत नाही.....

**उत्तर :** याचं एक कारण असं असेल की, मी मला जे काही मांडायचं आहे ते लोकं दुखावतील अशा पद्धतीनं मांडत नव्हतो. मी जे मांडत होतो ते एखाद्या व्यक्तीला किंवा तेव्हाच्या एखाद्या गोष्टीला उद्देशून नसे. लोकांना मी तत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आणि मतभेद नोंदवताना हेतूंवर आरोप करायचा नाही, हे पथ्य पाळलं. एखादं तत्त्वज्ञान भलेही मला पटत नसेल, पण त्या तत्त्वज्ञानावर आयुष्यभर प्रामाणिक श्रद्धा ठेवणारी माणसं मी पाहिली आहेत. मी त्यांच्याबद्दल बोलताना त्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल बोललो. व्यक्तिगत कुणाबद्दल बोलून त्यांना दुखावलेलं नाही. मला असं वाटतं की, आपल्या मनात एक प्रकारची उदारता असेल तर लोकं आपलं म्हणणं ऐकून घेतात.

**प्रश्न :** या वयात तुमची बौद्धिक कार्यक्षमता टिकून आहे. या वयातही फार सुसंगत असं लिखाणं आपल्याकडून होतं. हे कुठून आलं आहे?

**उत्तर :** हे माझ्या आई-वडिलांकडून आलं आहे. माझे वडील सत्यानऊ वर्षांचे होईपयंत माझ्याकडे होते. माझी आई 95 व्या वर्षांपर्यंत माझ्याकडे होती. ते नुसते होते असे नाही, तर त्या दोघांचीही बुद्धी, विचारशक्ती, स्मृती अतिशय तीक्ष्ण होती. संपूर्ण जागी होती. हे जनेटिक आहे. थोडंफार माझं असेल. ते ज्या पद्धतीनं जीवन जगले, त्यातून मी एक शिकलो की, जे आपल्याला अपायकारक आहे, त्याचा मोह धरायचा नाही. तर संयमाचा जो धडा आहे तो मी पाळला. मी फक्त एवढचं म्हणेल की, जे मला आई-वडिलांकडून मिळालं ते मी बिघडवलं नाही....

**प्रश्न :** इतकं सगळं लिहिल्यानंतर आता अजून काही लिहायचं राहिलं आहे, असं काही आहे काय?

**उत्तर :** मला लोकशाहीबद्दल लिहायचं आहे. म्हणजे लोकशाहीची अकॅडमीक चर्चा करणारं पुस्तक लिहायचं नाही. तर आपण एक जीवनमूल्य म्हणून लोकशाही स्वीकारली आहे काय त्याचा मला शोध घ्यायचा आहे. गांधीजी सत्याग्रहींना विचारीत की अहिंसा हे जीवनमूल्य म्हणून तुम्ही स्वीकारलं आहे काय? मला त्याची आठवण होते. आपण भारतीयांनी जीवनमूल्य म्हणून लोकशाही स्वीकारली आहे काय आणि तशी ती स्वीकारली नसेल तर त्याची कारणं काय आहेत, याविषयी मला लिहायचं आहे....

(आकाशवाणीवरून प्रसारित झालेल्या मुलाखतीचा संपादित भाग)

***